महाराष्ट्र सदन, नवी दिल्ली येथील कामकाजाच्या <u>सादरीकरणाच्या कार्यपध्दतीबाबत.</u>

**महाराष्ट्र शासन**
**सामान्य प्रशासन विभाग,**
**शासन निर्णय क्रमांक: साप्रआ-२०२६/प्र.क्र.१२६/आस्था-१**

मंत्रालय विस्तार इमारत, ५ वा मजला,
मादाम कामा मार्ग, हुतात्मा राजगुरु चौक,
मंत्रालय, मुंबई- ४०० ०३२
दिनांक :- १८ मे, २०२६

**संदर्भ:-** १) सामान्य प्रशासन विभाग, शासन निर्णय क्रमांक एससीओ १०९६/९००/ प्र.क्र.४७/९६/ २०-अ, दि.०९.०५.१९९७.
२) निवासी आयुक्त यांचे कार्यालय, महाराष्ट्र शासन, महाराष्ट्र सदन, नवी दिल्ली यांचा शासन निर्णय क्रमांक निआ/लोप्रक/प्र.क्र.२३०/२००६/३३९८, दि.१४.११.२००६
३) सामान्य प्रशासन विभाग, पत्र क्र. बैठक-२०२५/प्र.क्र.१२५/राजभ, दि. ०९.०१.२०२६

**<u>शासन निर्णय</u>**

संदर्भ क्रमांक १ येथील दि.०९.०५.१९९७ रोजीच्या शासन निर्णयान्वये विशेष आयुक्त, महाराष्ट्र सदन, नवी दिल्ली यांना “विशेष आयुक्त आणि पदसिध्द सचिव, महाराष्ट्र शासन, महाराष्ट्र सदन, नवी दिल्ली” असे संबोधण्यास मंजूरी देण्यात आली असून त्यांना प्रशासकीय विभागप्रमुख म्हणून घोषित करण्यात आले आहे. तसेच त्यांच्याकडे सोपविण्यात आलेल्या सर्व विषयांसाठी/ बाबींसाठी ते संपूर्णपणे जबाबदार आहेत. संदर्भ क्रमांक २ येथील शासन निर्णयान्वये वरील पदनामामध्ये बदल करुन “निवासी आयुक्त, महाराष्ट्र सदन, नवी दिल्ली” असे पदनाम सुधारित केले आहे.

२. मुख्य सचिव यांच्या अध्यक्षतेखाली महाराष्ट्र सदन, नवी दिल्ली येथील विविध विषयांबाबत दि.०१.०१.२०२६ रोजी आयोजित बैठकीत वरील परिच्छेदातील वस्तुस्थितीच्या पार्श्वभूमीवर असा निर्णय घेण्यात आला आहे की, महाराष्ट्र सदनच्या सर्व प्रकारच्या कामकाजाचा कार्यभार सद्य:स्थितीत सामान्य प्रशासन विभाग, राजशिष्टाचार उप विभागाकडून न हाताळता, यापुढे निवासी आयुक्त व सचिव, महाराष्ट्र सदन, नवी दिल्ली यांच्या स्तरावरुन हाताळण्यात येईल.

३. वरील परिच्छेद २ मधील निर्णयानुसार यापुढे निवासी आयुक्त व सचिव, महाराष्ट्र सदन, नवी दिल्ली यांनी महाराष्ट्र सदनाच्या सर्व प्रकारच्या कामकाजाचे प्रस्ताव सामान्य प्रशासन विभाग (राजशिष्टाचार) यांच्याकडे सादर न करता स्वतंत्रपणे त्यांच्या स्तरावरुन सदर कामकाज पार पाडावे.

४. सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध असून त्याचा संकेतांक २०२६०५१८१५१६४७७९०७ हा आहे. हा निर्णय डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

KIRAN KASHINATH SHINDE

Digitally signed by KIRAN KASHINATH SHINDE
DN: c=IN, o=GOVERNMENT OF MAHARASHTRA, ou=GENERAL ADMINISTRATION DEPARTMENT, 2.5.4.20=e87a32115497d05a2e91b08062bea862d1d55f490eb311d2f0e47e2fa1faf797, postalCode=400032, st=Maharashtra, serialNumber=9FF022F2E9C0F3C0DF2FD6BEE75DF1F6AE3C48080BAD7972572EE58C3F741862, cn=KIRAN KASHINATH SHINDE
Date: 2026.05.18 15:17:46 +05'30'

**( कि. का. शिंदे )**
**अवर सचिव, महाराष्ट्र शासन**

**प्रति,**

निवासी आयुक्त व सचिव, महाराष्ट्र सदन, नवी दिल्ली.

**प्रत,**

१. मा. राज्यपाल यांचे सचिव, राजभवन, मुंबई,
२. मा. मुख्यमंत्री यांचे अपर मुख्य सचिव, मंत्रालय, मुंबई,
३. मा.उप मुख्यमंत्री (नगर विकास, गृहनिर्माण), यांचे अपर मुख्य सचिव, मंत्रालय, मुंबई,
४. मा.उप मुख्यमंत्री (राज्य उत्पादन शुल्क, क्रीडा व युवक कल्याण, अल्पसंख्यांक विकास व औकाफ) यांचे सचिव, मंत्रालय, मुंबई,
५. मा. मंत्री (सर्व), महाराष्ट्र राज्य यांचे खाजगी सचिव, मंत्रालय, मुंबई,
६. मा. राज्यमंत्री (सर्व), महाराष्ट्र राज्य यांचे खाजगी सचिव, मंत्रालय, मुंबई,
७. मा. विरोधी पक्षनेता, महाराष्ट्र विधानसभा यांचे खाजगी सचिव, महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय, विधानभवन, मुंबई,
८. मा. विरोधी पक्षनेता, महाराष्ट्र विधानपरिषद यांचे खाजगी सचिव, महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय, विधानभवन, मुंबई,
९. मा. लोकसभा/राज्यसभा सदस्य (सर्व), महाराष्ट्र राज्य,
१०. मा. विधानसभा/विधान परिषद सदस्य (सर्व), महाराष्ट्र राज्य,
११. मा.मुख्य सचिव, महाराष्ट्र राज्य, मंत्रालय, मुंबई,
१२.अपर मुख्य सचिव/प्रधान सचिव/सचिव,सर्व मंत्रालयीन प्रशासकीय विभाग, मंत्रालय, मुंबई-३२,
१३. सर्व अपर मुख्य सचिव / प्रधान सचिव/ सचिव, सामान्य प्रशासन विभाग यांचे वरिष्ठ स्वीय सहायक, मंत्रालय, मुंबई-३२,
१४. प्रधान सचिव व विधि परामर्शी, विधि व न्याय विभाग, मंत्रालय, मुंबई-३२,
१५. संचालक, लेखा व कोषागारे, मुंबई,
१६. महालेखापाल-१/२ (लेखा व अनुज्ञेयता) महाराष्ट्र, मुंबई/नागपूर,
१७. महालेखापाल-१/२ (लेखा परीक्षा), महाराष्ट्र, मुंबई/नागपूर,
१८. अधिदान व लेखा अधिकारी, मुंबई,
१९. निवासी लेखा परिक्षा अधिकारी, मुंबई,
२०. भारतीय जनता पार्टी, महाराष्ट्र प्रदेश, सी.डी.ओ.बॅरेक्स क्र.१, योगक्षेमसमोर, वसंतराव भागवत चौक, नरिमन पॉईंट, मुंबई- ४०० ०२०,

२१. इंडियन नॅशनल कॉंग्रेस पार्टी, महाराष्ट्र प्रदेश कॉंग्रेस (आय) समिती, टिळक भवन, काकासाहेब गाडगीळ मार्ग, दादर, मुंबई-४०००२५,

२२. नॅशनॅलिस्ट कॉंग्रेस पार्टी (शरदचंद्र पवार), ठाकरसी हाऊस, बेलार्ड इस्टेट, मुंबई,

२३. शिवसेना (उद्धव बाळासाहेब ठाकरे), शिवसेना भवन, गडकरी चौक, दादर, मुंबई-४०००२८,

२४. शिवसेना, आनंद आश्रम, श्री भवानी चौक, टेंभी नाका, ठाणे-४००६०१,

२५. बहुजन समाज पार्टी, म.रा., बी.एस.पी. भवन, भुखंड क्र.८३-ए, कलेक्टर कॉलनी चेंबूर, मुंबई-४०००७४,

२६. भारतीय कम्युनिस्ट पार्टी, महाराष्ट्र कमिटी, ३१४, राज भवन, एस.व्ही.पटेल रोड, मुंबई-४०० ००४,

२७. भारतीय कम्युनिस्ट (मार्क्सवादी) पार्टी, महाराष्ट्र कमिटी, ग्लोब मिल पॅलेस, वरळी, मुंबई,

२८. महाराष्ट्र नवनिर्माण सेना, राजगड, मातोश्री टॉवर शिवाजी पार्क, दादर, मुंबई-४०० ०२८,

२९. सर्व सह सचिव, उप सचिव, अवर सचिव, कक्ष अधिकारी, सामान्य प्रशासन विभाग, मंत्रालय, मुंबई-४०००३२

३०. निवडनस्ती-आस्था-१